अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 20 ऑगस्ट 2026 | वर्ष 12 वे | अंक 02 रा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये


# ब्रम्हपुरीकरांना मच्छरांचा वेढा : न.प.चे धुरफवारणीकडे दुर्लक्ष

## धुरफवारणी उन्हाळ्यात करणार का? - नागरिकांचा न.प. व लोकप्रतिनिधींना संतप्त सवाल

ब्रह्मपुरी/का.प्र.

सध्या ब्रह्मपुरी शहरात एकच गोष्ट ओसंडून वाहतेय, ती म्हणजे मच्छरांची दहशत. संध्याकाळ झाली की घराचे दरवाजे-खिडक्या बंद करूनही डासांपासून सुटका मिळत नाही. मच्छरांना जणू हे शहर खूपच आवडलंय आणि त्यांनी इथे आपला हक्काचा मुक्काम ठोकलाय. पण आश्चर्याची आणि तितकीच संतापाची गोष्ट म्हणजे, ज्या नगरसेवक आणि प्रशासनावर या समस्येचं निवारण करण्याची जबाबदारी आहे, ते मात्र सोयीस्करीत्या डोळेझाक करत आहेत. वैतागलेल्या नागरिकांनी आता प्रशासनाला थेट विचारणा सुरू केली आहे की, 'साहेब, धूरफवारणी काय थेट कडक उन्हाळा आल्यावर करणार आहात का?'

शहरात सध्या डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांची भीती लोकांच्या मनात घर करून आहे. खासगी आणि सरकारी दवाखान्यांमध्ये रुग्णांची गर्दी वाढतेय. मच्छरांसाठी ब्रह्मपुरी शहर म्हणजे एक 'मोकळं मैदान' बनलं आहे. प्रशासनाला याचं



गांभीर्य का समजत नाही, हाच मोठा प्रश्न आहे. मच्छर नियंत्रणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, याचा कोणताही ताळमेळ किंवा हिशोब सध्या तरी कुठेच दिसत नाही. नागरिक प्रामाणिकपणे कर भरतात, निवडणुकीत न चुकता मतदान करतात, वेळोवेळी आपल्या समस्या मांडतात. मग आता आरोग्यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर उत्तर कोण देणार?

ॐ । । ट । ।

ब्रह्मपुरीकरांच्या संयमाचा बांध फुटला असून त्यांनी थेट आपल्या लोकप्रतिनिधींना आणि नगरसेवकांना पाच सडेतोड प्रश्न विचारले आहेत. त्यात साहेब, आपल्या प्रभागात आतापर्यंत फवारणी नेमकी किती वेळा झाली? डासांची अंडी नष्ट करण्यासाठी (अँटी-लार्व्हल) काही ठोस उपाययोजना कधी केल्या का? शहरात शेवटची फॉगिंग किंवा धूरफवारणी नक्की कधी झाली होती, याची काही नोंद आहे का? मच्छर नियंत्रणासाठी नगरपरिषदेकडे खरोखरच काही कृती आराखडा आहे की सगळा कारभार हवेतच सुरू आहे? आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, नागरिकांच्या या समस्येसाठी तुम्ही प्रशासनाकडे किती वेळा पाठपुरावा केला? प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

मच्छरांची संख्या

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# राज्यात ओबीसींसाठी आरक्षित सरपंचपदांच्या संख्येत घट

## ५० टक्क्यांच्या मर्यादेत आरक्षण : ग्रामविकास विभागाची अधिसूचना

ब्रम्हपुरी/का.प्र.

ओबीसींसाठी आरक्षित सरपंचपदांची संख्या पूर्वीच्या तुलनेत ५१२ ने कमी होणार आहे. ग्रामपंचायत निवडणुकीतील आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिल्यानंतर ग्रामविकास विभागाने १५ जिल्ह्यांतील ओबीसींच्या सरपंचपदांबाबत सुधारित आदेश काढले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने १३ जून २०२५ रोजी आरक्षण निश्चित करण्याबाबत

### : सरपंच पदांचे आरक्षण :

| प्रवर्ग | आधी | आता | बदल |
|---|---|---|---|
| ओबीसी | ६७१९६ | २०७ | ५१२ ने घट |
| खुला | १३०७७१३ | ५८९ | ५१२ ने वाढ |
| एकूण | १९७९६१९ | ७९६ | ------------ |

अधिसूचना काढली होती. त्यानुसार १५ जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींसाठी सरपंचपदाची ६,७१९ पदे आरक्षित करण्यात आली होती. त्यापैकी ३,३७३ पदे महिलांसाठी राखीव होती. खुल्या प्रवर्गासाठी १३,०७७ पदे निश्चित करण्यात

### या जिल्ह्यांसाठी सुधारित आदेश

**धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि वर्धा.**

आली होती. त्यापैकी ६,५४१ पदे महिलांसाठी राखीव होती.

३० एप्रिलच्या नव्या आदेशानुसार ओबीसींसाठी आरक्षित सरपंचपदांची संख्या आता ६,२०७ करण्यात आली आहे. त्यापैकी ३,१११ पदे महिलांसाठी राखीव असतील. तर खुल्या प्रवर्गातील सरपंचपदांची संख्या १३,५८९ झाली असून, त्यापैकी ६,८०३ पदे महिलांसाठी राखीव असतील.

# गहाळ झालेले मोबाईल मूळ मालकांना परत

ब्रह्मपुरी/का.प्र.

मोबाईल हरवला किंवा गहाळ झाला की नागरिकांची मोठी अडचण होते. मात्र, ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनने सायबर तंत्रज्ञानाचा कौतुकास्पद वापर करत ब्रह्मपुरी परिसरातून गहाळ झालेले तब्बल ०८ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळवले आहे. हे शोधून काढलेले मोबाईल फोन मूळ मालकांना पोलीस प्रशासनाच्या वतीने नुकतेच सुपूर्द करण्यात आले.

ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरातून गेल्या काही दिवसांत नागरिकांचे मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत, भारत सरकारच्या CEIR पोर्टल आणि सायबर सेलच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबवण्यात आली.




## संपादकीय...

# खड्डयांचे पुराण कधी संपणार?

महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये सध्या रस्त्यांची अवस्था भयावह झाली आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या महानगरांपासून जिल्हा आणि तालुक्याच्या शहरांपर्यंत सर्वत्र खड्डयांचे साम्राज्य पसरलेले दिसते. नाशिकमध्ये खड्डयांमुळे सहापेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले आहे. बेंगळुरूमध्ये खड्डयामुळे एका तरुण अभियंता महिलेचा जीव गेला. तेलंगणा, उत्तर प्रदेश यांसह अन्य राज्यांतही अशाच घटना घडत आहेत. म्हणजेच ही समस्या एखाद्या एका शहरापुरती किंवा राज्यापुरती मर्यादित राहिलेली नाही; ती देशातील शहरी पायाभूत सुविधांच्या व्यवस्थापनावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

खड्डे पडण्याचे खापर दरवर्षी पावसावर फोडले जाते. पाऊस जास्त झाला म्हणून रस्ता खराब झाला, अशी सोयीची कारणे दिली जातात. दरवर्षी ठरावीक काळात पाऊस पडतो, हे माहीत असतानाही रस्ते बांधले जातात. मग पावसाचे पाणी सहन करू शकणार नाहीत, अशा दर्जाचे रस्ते का बांधले जातात? पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था का केली जात नाही? रस्ते बांधताना योग्य दर्जाचे साहित्य आणि तंत्रज्ञान का वापरले जात नाही? आणि रस्ता तयार झाल्यानंतर त्याची नियमित देखभाल का होत नाही? या प्रश्नांची उत्तरे पावसाकडे पाहून मिळणार नाहीत, ती प्रशासन आणि कंत्राटदारांच्या कार्यपद्धतीत शोधावी लागतील.

विशेष म्हणजे, हजारो कोटी रुपये खर्चुन उभारलेले महामार्गही खड्डयांच्या तावडीतून सुटलेले नाहीत. समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरही खड्डयांचे संकट ओढवले आहे. मुंबई-गोवा महामार्गाची अवस्था तर गेली अनेक वर्षे चर्चेचा विषय आहे. वाहन चालकांकडून मोठ्या प्रमाणात टोल वसूल केला जात असताना रस्ते खड्डेमुक्त का नसावेत, हा सामान्य नागरिकांचा रास्त प्रश्न आहे. टोलच्या रकमेतून वाहन चालकांना वेगवान, सुरक्षित आणि दर्जेदार प्रवास मिळणे अपेक्षित असते; त्याऐवजी जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असेल तर विकासाच्या दाव्यांची विश्वासार्हता किती उरते? खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांचे अपघात होतात, चार चाकी वाहनांचे नुकसान होते, रुग्णवाहिका आणि सार्वजनिक वाहतूक अडकते. वाहतुकीचा वेग मंदावल्याने हजारो नागरिकांचा दररोजचा वेळ वाया जातो. उद्योग आणि व्यापारावरही त्याचा परिणाम होतो. पुणे जिल्ह्यातील चाकण औद्योगिक परिसरातील खराब रस्त्यांमुळे उद्योगांचे स्थलांतर होण्याची भीती व्यक्त केली जात असेल, तर ही बाब सरकारने अत्यंत गांभीर्याने घेतली पाहिजे. चांगले रस्ते हे केवळ नागरिकांच्या सोयीचे साधन नसून अर्थव्यवस्थेच्या गतीचेही महत्त्वाचे माध्यम आहेत.

या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूंनी खड्डयांवर नाराजी व्यक्त केली जाते. अगदी मंत्र्यांनाही रस्त्यांच्या अवस्थेबद्दल जाहीर नाराजी व्यक्त करावी लागते, याचा अर्थ परिस्थिती गंभीर आहे. मात्र नाराजी व्यक्त करण्यापलीकडे ठोस कृती कुठे आहे? खड्डे बुजविण्याच्या तात्पुरत्या मोहिमा दरवर्षी सुरू होतात आणि पुढच्या पावसाळ्यात त्याच ठिकाणी पुन्हा खड्डे पडतात. निकृष्ट कामामुळे रस्ता खराब झाल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदाराच्या खर्चाने झाली पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, खड्यांमुळे अपघात होऊन मृत्यू किंवा गंभीर दुखापत झाल्यास दोषी आढळणाऱ्या संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवरही उत्तरदायित्व निश्चित झाले पाहिजे. सार्वजनिक पैशातून रस्ता बांधायचा, तो निकृष्ट दर्जाचा करायचा आणि त्यातून नागरिकांचे जीव धोक्यात आले तरी कोणाचीही जबाबदारी निश्चित करायची नाही. ही व्यवस्था बदलली पाहिजे.

पाऊस दरवर्षी येणारच. प्रश्न एवढाच आहे की, पावसाबरोबर खड्डयांचे पुराणही दरवर्षी सुरू राहणार का ? जर तसेच होणार असेल तर विकासाच्या घोषणांपेक्षा नागरिकांच्या जिवाची किंमत कमी आहे, असा संदेशच त्यातून जाईल. त्यामुळे खड्डे बुजविण्याची नव्हे, तर खड्डे पडणारच नाहीत अशी व्यवस्था निर्माण करण्याची वेळ आली आहे. प्रशासन, कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली, तरच या प्रश्नाला पूर्णविराम मिळेल. अन्यथा दरवर्षी पावसासोबत खड्डे येतील आणि त्यांच्यासोबत निष्पाप नागरिकांचे बळीही जात राहतील.

# 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७' विषयावर प्रभावी सादरीकरण

## ने.हि. विद्यालय, नवेगांव पांडवला सलग दुसऱ्यांदा तालुक्याचे प्रतिनिधीत्व करण्याचा मान




नागभीड/प्रतिनिधी

दि. ११ ऑगस्ट रोजी आयोजित तालुकास्तरीय 'अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात' नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगाव पांडवची विद्यार्थिनी कु. अर्पिता अमोल गेडाम हिने द्वितीय क्रमांक पटकावत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे नवेगाव पांडव आणि विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यावर्षी विज्ञान मेळाव्यासाठी 'भारतीय ऊर्जा क्षेत्रे २०४७ : संभाव्यता व आव्हाने' हा अत्यंत महत्त्वाचा आणि आव्हानात्मक विषय ठेवण्यात आला होता. अर्पिताने या विषयाची सखोल माहिती, भविष्यातील ऊर्जेची गरज आणि त्यासमोरील आव्हाने यावर अत्यंत प्रभावी व मुद्देसूद सादरीकरण करून परीक्षकांची मने जिंकली. विशेष बाब म्हणजे, अर्पिताने गेल्या वर्षीही जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यात नागभीड तालुक्याचे यशस्वी नेतृत्व केले होते. यावर्षीही तालुकास्तरावर उपविजेतेपद मिळवून तिने सलग दुसऱ्या वर्षी तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान स्वत:च्या नावे केला आहे.

अर्पिताच्या या यशामागे विद्यालयाचे विज्ञान शिक्षक श्री. राहुल फटाले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकवृंद , शिक्षकेतर कर्मचारी स्थानिक नागरिक व पालकांनी अर्पिता गेडाम व तिचे मार्गदर्शक शिक्षक राहुल फटाले यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वातंत्र्य दिनी अड्याळ टेकडीवर 'श्रमदानाचा उत्सव'

## तुकारामदादांच्या विचाराचा वारसा कायम; शेकडो कार्यकर्त्यांनी एकत्रित केली धानाची रोवणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्वातंत्र्यदिन म्हटला की चौकाचौकात ध्वजारोहण, भाषणं आणि देशभक्तीपर गाणी आपण नेहमीच ऐकतो. पण 'आत्मानुसंधान भू-वैकुंठ अड्याळ टेकडी'वर मात्र यंदाच्या १५ ऑगस्टला देशभक्तीचं एक वेगळंच आणि अतिशय प्रेरणादायी रूप पाहायला मिळालं. सकाळी ध्वजारोहण पार पडल्यानंतर,




हातात शेतीची औजारं घेऊन शेकडो कार्यकर्ते थेट शेतात उतरले आणि एकाच दिवसात धानाची पेरणी (रोवणा) पूर्ण करून पूज्य तुकारामदादा गीताचार्य यांच्या श्रमदानाच्या परंपरेला नव्याने उजाळा दिला. शनिवारी १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता संचालक आणि मार्गदर्शक सुबोधदादा यांच्या प्रमुख उपस्थितीत अड्याळ टेकडीवर अत्यंत उत्साहात ध्वजारोहण करण्यात आलं. राष्ट्रध्वजाला वंदन केल्यानंतर लगेचच सुरू झाला खरा 'श्रमदानाचा उत्सव'.

ध्वजारोहण संपताच भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावांमधून आलेले शेकडो महिला-पुरुष कार्यकर्ते शेतात दाखल झाले. भंडारा जिल्ह्यातील मोखारा, मांदेड, रोहणी, बाम्हणी, लोणारा, आसोला या गावांसह चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरीतील टिळक नगर, चौगाण, नवेगाव पांडव, कोजबी चक, मांगरूड, उश्राळ मेंढा, अड्याळ जानी, चोरटी, आंबोली, नागपूर, पांढरवाणी आणि पारडी अशा कितीतरी गावांतील कार्यकर्ते यात हिरिरीने सहभागी झाले होते. सगळ्यांनी हातात हात घालून, गाणी गात आणि गप्पा मारत अतिशय आनंदी वातावरणात धानाचा रोवणा अवघ्या काही तासांत पूर्ण केला. ५० वर्षांपासून चालत आलेली ही सामूहिक श्रमदानाची परंपरा तितक्याच निष्ठेने जपली जात असल्याचं चित्र पाहायला मिळालं.

## होमराज राऊत दुसऱ्यांदा तंमुस अध्यक्षपदी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील अऱ्हेर नवरगांव येथे ग्रामसभा पार पडली यात गावातील विकासात्मक आराखड्यावरती चर्चा करण्यात आली. सोबतच ग्रामसभेत तंटामुक्ती कार्यकारिणीची फेर रचना करीत होमराज राऊत यांची तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल वामनरावजी मिसार, अमरदीप लोखंडे, डाकराम ठेंगरे पाटील, जागेश्वर चौधरी, नवलाजी सोंदरकर, राहुल कोल्हे, खुशाल टेंभुरकर यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## विनोदिनी

सुवर्णा: अगं राधा, माझं वजन अजिबातच कमी होत नाहीये ग! काय करू?
राधा: तू रोज सकाळी धावायला जात जा!
सुवर्णा: जाते की ग दररोज...
राधा: मग तरीही वजन का कमी होत नाहीये?
सुवर्णा: अगं, धावून आल्यावर मला खूप भूक लागते, म्हणून मी ४ पुरणपोळ्या आणि २ वाटी तूप खाऊन झोपते!
राधा: अगं आई ग! तू धावायला जातेस की भूक वाढवायला...?

# ब्रम्हपुरी-आरमोरी महामार्गाच्या दुरवस्थेवरून नागपूर हायकोर्टाचा पीडब्ल्युडीला दणका

## कापडावरील ठिगळासारखी रस्त्याची दुरूस्ती होत असल्याचे ठणकावले

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी-आरमोरी महामार्गाच्या खड्डयांनी आणि सिमेंट रस्त्याला पडलेल्या भेगांनी प्रवाशांचे हाल केले आहेत. या दुरवस्थेवरून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सार्वजनिक बांधकाम विभागाची चांगलीच खरडपट्टी काढली. 'अशा प्रकारचं काम आम्ही आजवर कुठेच बघितलं नाही, जणू कापडावर ठिगळ लावल्यासारखं काम सुरू आहे,' अशा अत्यंत कडक शब्दांत न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर ताशेरे ओढले. या संपूर्ण प्रकरणी येत्या १८ ऑगस्टपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्याचे थेट निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

जनमंच या संघटनेने सिमेंट रस्त्यांच्या दुर्दशेशी संबंधित एक याचिका दाखल केली आहे. न्या. उर्मिला जोशी-फाळके आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर महत्त्वाची सुनावणी पार पडली. मागील सुनावणीदरम्यान न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाला चांगलंच फटकारलं होतं, ज्यानंतर विभागाने घाईघाईने रस्त्यावरील भेगा भरण्याचं काम हाती घेतलं. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत 'आम्ही दुरुस्तीचं काम सुरू केलंय,' असं सांगत सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयात कामाचे काही फोटो सादर केले. पण हे फोटो पाहताच न्यायालयाचा संताप अनावर झाला. रस्त्याच्या दुरुस्तीचे फोटो पाहून न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाच्या दर्जावरच थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'सिमेंटच्या भेगा भरण्याचं काम अत्यंत निकृष्ट दर्जाचं आहे. देशातील अनेक राज्यांचे दौरे केले, तिकडचे रस्ते पाहिले, पण अशी थातुरमातूर दुरुस्ती कुठेच पाहिली नाही,' अशा शब्दांत न्यायालयाने आपला संताप व्यक्त केला.

जेव्हा न्यायालयाने यावर विभागाकडे जाब विचारला, तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाने नेहमीप्रमाणे मान्सूनचं कारण पुढे केलं. 'पावसाळ्यात कुठलेही पक्के काम करता येत नाही, त्यामुळे कोणत्याही पद्धतीने काम केले तरी स्थिती हीच राहणार,' असा अजब युक्तिवाद सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयात मांडला. हा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने विभागाच्या एकूणच कारभारावर नाराजी व्यक्त केली. 'आम्ही काही या क्षेत्रातील तंत्रज्ञ किंवा तज्ज्ञ नाही, पण समोर असलेले फोटो पाहून सर्वसामान्य माणूसही सांगू शकतो की या कामाचा दर्जा काय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अशा निष्काळजी कामाची मुळीच अपेक्षा नव्हती,' असे म्हणत न्यायालयाने आता सार्वजनिक बांधकाम विभागाला १८ ऑगस्टपर्यंत आपलं म्हणणं आणि स्पष्टीकरण मांडण्याचे कडक आदेश दिले आहेत. येत्या सुनावणीत सार्वजनिक बांधकाम विभाग काय उत्तर देणार आणि न्यायालयाच्या या चाबका नंतर तरी रस्त्याचं भाग्य बदलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये पदग्रहण समारंभ संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी Student Council Election Online प्रक्रिया गुरूवार दि. ६ ऑगष्ट २०२६ ला पार पाडण्यात आली. त्यानंतर पदग्रहण समारंभ बुधवार दि. १२ ऑगष्ट २०२६ ला संपन्न झाला. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून एल. एम. बी. स्कुलचे अध्यक्ष अशोक भैया उपस्थित होते. सोबतच शाळेच्या संचालिका, प्राचार्य, उपप्राचार्य व पर्यवेक्षिका शिक्षक-शिक्षिका तथा शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थी परिषदेची स्थापना लोकतांत्रिक पद्धतीने करण्यात आली. त्यामध्ये नामांकन आवेदन, भाषण आणि मतदानाच्या माध्यमातून हेड बॉय व हेड गर्ल ची निवड करण्यात आली. हेड बॉय म्हणून शिवम क्षिरसागर व हेड गर्ल म्हणून अभिज्ञा परकरवार ची निवड करण्यात आली. तसेच शाळेतील चार गृप (रूबी, सफायर, एमरेल्ड, टोपाझ) या गृप प्रमुखांचीही निवड करण्यात आली. रूबी हाऊससाठी कॅप्टन ओजस तलमले, स्वराली पिलारे, उपकॅप्टन समन्वी डहारे, शिवांश नवघडे, प्रिफेक्ट सानिध्य लांजेवार, एमरेल्ड हाऊस साठी कॅप्टन स्वरूप लांजेवार, उन्नती राऊत, उपकॅप्टन लक्ष वानखेडे, परिनिती कुळमेथे, प्रिफेक्ट प्रीत मोटवानी, सफायर हाऊस साठी कॅप्टन साहिल देशमुख, अवनी तिडके, उपकॅप्टन चैतन्य अनोले, पुर्वी अलबनकर, प्रिफेक्ट लक्ष फुलबांधे, टोपाझ हाऊस साठी कॅप्टन सर्वेश ठवरे, सोनाक्षी वेद्य, उपकॅप्टन आराध्या ठाकूर, अगस्ता तलमले, प्रिफेक्ट स्पर्श दमकोंडवार यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व विद्यार्थ्यांना बॅच व स्लॅश देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांचा शपथविधी समारंभ पार पडण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नविन भुमिकांची मूल्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्याचे वचन दिले. यात्रसंगी अशोक भैया यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले. सुत्रसंचालन शामली मेने व अपर्णा सरदार मॅडम यांनी केले.

# ब्रम्हपुरीत एमआयडीसी मंजूर करा

## शिवसेना तालुका प्रमुखांचे उद्योगमंत्री सामंत यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात नवीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) केंद्र मंजूर करून भूखंड अधिग्रहित करण्यात यावा, या मागणीसाठी शिवसेनेचे ब्रम्हपुरी तालुकाप्रमुख नरेंद्र नरड यांनी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची प्रत्यक्ष भेट घेतली. या अत्यंत महत्त्वाच्या व न्याय्य मागणीचे सविस्तर निवेदन देऊन त्यांनी उद्योगमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा केली.

निवेदनामध्ये ब्रम्हपुरी हा ऐतिहासिक, शैक्षणिक आणि भौगोलिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा तालुका असूनही येथे एकही औद्योगिक वसाहत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. योग्य रोजगाराच्या अभावामुळे दरवर्षी येथील हजारो सुशिक्षित, कुशल आणि अकुशल तरुण-तरुणींना पुणे, मुंबई, नागपूर किंवा शेजारील राज्यांमध्ये स्थलांतर करावे लागत आहे. हे स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर हाताला काम देणे अत्यंत गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ब्रम्हपुरी परिसर हा नवीन एमआयडीसी स्थापन करण्यासाठी सर्व दृष्टीने अत्यंत अनुकूल असून, त्याबाबत निवेदनात खालील प्रमुख मुद्दे मांडण्यात आले आहेत

तालुक्यातून वाहणाऱ्या पवित्र वैनगंगा नदीमुळे औद्योगिक क्षेत्राला लागणारा पाणीपुरवठा वर्षभर सहज उपलब्ध होऊ शकतो. ब्रम्हपुरी हे राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांशी उत्तमरीत्या जोडलेले आहे. तसेच रेल्वे कनेक्टिव्हिटीमुळे मालाची वाहतूक आणि दळणवळण करणे अतिशय सोपे ठरेल. औद्योगिक वसाहतीसाठी लागणारी पुरेशी शासकीय व पडीक जमीन या परिसरात सहज उपलब्ध असल्याने भूसंपादनात कोणतीही मोठी अडचण येणार नाही. ब्रम्हपुरी हे एक मोठे शैक्षणिक केंद्र आहे. येथे आय.टी.आय. (ITI), पदवीधर आणि तांत्रिक शिक्षण घेतलेले हजारो तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत उपलब्ध आहेत. या भागात धान (तांदूळ) उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. भेटीदरम्यान नरेंद्र नरड यांच्यासोबत शिवसेना शहरप्रमुख अमोल माकोडे, उपशहरप्रमुख आशिष गांडलेवार व पदाधिकारी उपस्थित होते.

# अवैध रेती तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलीसांची कारवाई

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यात अवैध धंद्यांना उत आला आहे. ब्रह्मपुरी पोलिसांची या अवैध व्यावसायिकांवर करडी नजर असून, यावर अंकुश लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ब्रह्मपुरी तालुक्यातील बेलगाव नदी घाटातून अवैध रेती उत्खनन करून तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टरवर ब्रह्मपुरी पोलिसांनी १६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास कारवाई केली. स्वराज कंपनीच्या विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये १ ब्रास रेतीची विनापरवाना वाहतूक केल्यामुळे ट्रॅक्टर चालक आरोपी रितीक रवींद्र बरडे (वय २४, रा. कोलारी) याच्याविरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेकायदेशीर भक्त निवास बांधकाम व तहसिलदार यांच्या अहवाल पत्राविरूध्द अड्याळ टेकडी येथे जाहीर भजन सत्याग्रह

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोज दुपारी २ वाजता भू वैकुंठ अड्याळ टेकडी येथे अवैध भक्त निवास बांधकामाचा प्रयत्न व मा. तहसीलदार ब्रम्हपुरी यांच्या गैरकायदेशीर मालकी अहवाल पत्राविरुद्ध भू वैकुंठ अड्याळ टेकडी येथे प्रमुख मार्गदर्शक व संचालक सुबोध दादा, प्रवीण राऊत पोलिस समन्वय समिती प्रधान अध्यक्ष, डॉ नवलाजी मुळे, रेखाताई, लक्ष्मीताई गुरुणुले, दिलीप मेश्राम, गंगाताई काकडे, डॉ प्रमोद माळवे, बबनराव अन्मुलवार, रोडे काकू, रमेश गवळी, भाऊराव बावणे, बाबुराव ठवरे, दिनकर सहारे, योगेश पडोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय भजन आंदोलन करण्यात आले.

भू वैकुंठ अड्याळ टेकडी येथे २० व २१ हे दोन गट अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज आश्रम अड्याळ व भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज आश्रम मोझरी अशा दोन भिन्न नावाने आहे. दोन्ही च्या नमुना १२ मध्ये मात्र पू तुकारामदादा गीताचार्य यांच्या भू वैकुंठ समिती, अड्याळ टेकडी ची नोंद आहे. सदर दोन्ही गटांवर १९६७ ते आजपर्यंत भू वैकुंठ समिती ची अखंडित ताबा वहिवाट आहे. सदर ताबा वहिवाट ही दिवाणी न्यायालय ब्रम्हपुरी, जिल्हा सत्र न्यायालय चंद्रपूर आणि उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या आदेशात सुद्धा स्पष्टपणे नमूद आहे. सदर जमीन मालमत्तेच्या मालकी हक्काच्या संबंधाने भू वैकुंठ समिती, अड्याळ टेकडी विरुद्ध अखिल भारतीय संस्था गुरुकुंज मोझरी असा वाद दिवाणी कोर्टात प्रलंबित असताना तहसीलदाराला यासंबंधी बोलण्याचा ठरविण्याचा काही अधिकारी नाही. असे असताना मा. तहसीलदार ब्रम्हपुरी यांनी हेतूपुरस्कर सदर जमिनीच्या गटावर अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज मोझरी यांचा मालकी असल्याचे दिसून येते, असे खोटे अहवाल पत्र बनवून दिले. न्यायालयात वाद सुरू असताना जमीन मालकी हक्काच्या संबंधाने काही ठरवण्याचा अधिकार तहसीलदार यांना आहे का? तसेच मूळ ताबेदार आणि वहिवाटदार भू वैकुंठ समिती यांना विश्वासात न घेता जानेवारी २०२६ मध्ये अचानक भक्त निवास बांधकामाचा प्रयत्न करण्यात आला. सदरचे बांधकाम थांबविले असल्याने मा तहसीलदार ब्रम्हपुरी यांनी असा विरुद्ध अहवाल सीओ साहेबाकडे दिला. या अन्यायाच्या विरुद्ध विविध गावातील भू वैकुंठ अड्याळ टेकडी प्रेमी सेवकांनी दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोज दुपारी अड्याळ टेकडी वर सदर घटनेचा जाहीर निषेध व विरोध व्यक्त केला.

येत्या १५ दिवसांत अड्याळ टेकडीवर बेकायदेशीर भक्त निवास बांधकामाची मंजुरी रद्द करण्यात यावी व मा. तहसीलदार यांचे २८ जुलै २०२६ चे भू वैकुंठ अड्याळ टेकडी मालकी संबंधाने केलेले चौकशी अहवाल पत्र त्वरीत रद्द करण्यात यावे अन्यथा शेकडो गावातील हजारोंच्या संख्येने गुरुदेव भक्त हे तीव्र आंदोलन करतील. असा ठराव सर्व भक्तांनी मिळून भजन आंदोलनात केला.

# स्वातंत्र्य दिन सोहळा विविधांगी कार्यक्रमांनी साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

**महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला :** महाविद्यालयात १५ ऑगस्टला ८० वा स्वतंत्रता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी मनोज पुस्तोडे माजी सैनिक भारतीय सेना यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी मनोज मारुती पुस्तोडे तसेच संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे सर, प्राचार्य सचिन दुधे,प्राचार्य विशाल लोखंडे, प्राचार्य व्यंकटेश कॅवर्स, प्राचार्य सुयोग बाळबुधे तसेच सर्व सहयोगी आणि सहकारी प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धा, देशभक्ती गीत, गायन स्पर्धा इत्यादी स्पर्धेमध्ये उत्साहाने आपला सहभाग नोंदवीला.

ध्वजारोहणाचो प्रास्ताविक प्रीतम वैद्य यांनी केले तसेच संचालन सुधीर बडदे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.कू.प्राची बारसगाडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. हितेश सहारे यांनी केले.

**ज्ञानोपासक विद्यालय, निलज -** येथे १५ ऑगस्ट २०२६ ला भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा अत्यंत चैतन्यमय उत्साहात आणि प्रखर देशभक्तीच्या वातावरणात साजरा झाला. कार्यक्रमाला निलज गावचे सरपंच हेमंतजी ठाकरे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वासनिक मॅडम व सर्व शिक्षक वृंद, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक वर्ग उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक चौधरी सर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला व ध्वजाला मानवंदना देण्यात आली. एम.सी.सी. पथ संचालनाने देखील राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

या दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या परिपत्रकानुसार शाळेमध्ये तंबाखूमुक्त व साक्षरतेची शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

**तर्वेकर महिला महाविद्यालय, नागभीड -** समिधा सेवा संस्था द्वारा संचालित सरस्वती जैरामजी तर्वेकर महिला महाविद्यालय, नागभीड येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव अजय काबरा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, प्राचार्या डॉ. रेखा जीभकाटे संगीता आंबोरकर, डॉ. पवन नागरे, अमित देशमुख, प्रवीण बंडावार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतार राष्ट्रगीत तसेच देशभक्तीपर कार्यक्रम सादर करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रप्रेम, देशभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## माजी प्राचार्य डॉ. रामटेकेंचे निधन



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तित्व आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील दीर्घकाळ राहिलेले माजी प्राचार्य डॉ एस.आर. रामटेके यांचे बुधवारी सकाळी ७.३०वा. वयाच्या ऐंशी व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले.

त्यांच्या निधनाची माहिती मिळताच पंचक्रोशीतील सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांनी शोक व्यक्त केला. अशा संवेदना व्यक्त केल्या. गुरुवारला सकाळी त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली,एक मुलगा,नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात शिवाजी विद्यालय तुळशी प्रथम



देसाईगंज/ता.प्र.

इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ मध्ये शिवाजी विद्यालय तुळशीच्या विद्यार्थिनीने दैदिप्यमान यश संपादन केले. कु. अंजली दुनेदार हिने तालुक्यात प्रथम क्रमांक तर अल्पेश घुटके जि. प. हायस्कूल कुरुड यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. हा विज्ञान मेळावा १३ ऑगस्ट रोजी गट साधन केंद्र सभागृह, देसाईगंज येथे उत्साहात पार पडला.

देसाईगंज तालुक्यातील १० शाळांमधील विद्यार्थ्यांनी या विज्ञान मेळाव्यात सहभाग नोंदविला. यावर्षी सादरीकरणाचा विषय 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भवितव्य (संधी) आणि आव्हाने' हा होता. कु. अंजली दुनेदार हिने विषयाची वैज्ञानिक मांडणी, नाविन्यपूर्ण दृक्-साहित्याचा प्रभावी वापर, भाषणाचा ओघ, प्रश्नांना अचूक उत्तरे देण्याची क्षमता तसेच लेखी आशय क्षमता चाचणीत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे परीक्षण के. आर. राऊत (लालबहादूर विद्यालय, डोंगरवार), प्रा. डॉ. ए. बी. कनोजिया (कुथे पाटील ज्युनिअर कॉलेज, देसाईगंज) आणि साधनव्यक्ती अरविंद घुटके यांनी केले.

कु. अंजली दुनेदार हिच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष प्रा. विजय कावळे, केंद्रप्रमुख आनंद गुरनुले, मुख्याध्यापक व्ही.एम. दुनेदार तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी तिचे आणि मार्गदर्शक शिक्षक डी. एल. चुलपार यांचे अभिनंदन केले.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# ब्रम्हपुरीत स्वातंत्र्य दिन बुध्दिबळ स्पर्धा संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १५ ऑगस्ट २०२६ ला भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्य ब्रम्हपुरी तालुका बुद्धिबळ संघटना ब्रम्हपुरी च्या वतीने 'स्व. अभिजित जगनाडे स्मृती स्वातंत्र्य दिन बुद्धिबळ स्पर्धा -२०२६'चे भव्य आयोजन स्वागत मंगल कार्यालय येथे करण्यात आले. स्पर्धेत एकूण १८२ खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेचे प्रयोजक 'स्व.अभिजित जगनाडे स्मृती प्रतिष्ठान ब्रम्हपुरी तर्फे एकूण १८ हजार रुपयाचे रोख बक्षीस व प्रोत्साहन पुरस्कार होते.

स्पर्धेचे उदघाटन १०.३० वाजता बीटीसीएचे संस्थापक सचिव हरिश्चंद्रजी चोले व पदाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. ओपन, पुर्व माध्यमिक व प्राथमिक गटातील सात फेऱ्या पूर्ण करून ५.०० वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. ओपन गटात-रितेश कामडी प्रथम, हर्शल भांडारकर द्वितीय व कंकम कुमार तृतीय तसेच पुर्व माध्यमिक गटात - विहान सुर्यवंशी प्रथम, वेद बोरकर द्वितीय, अन्वय चन्नावार तृतीय क्रमांकावर राहिला. प्राथमिक गटात - वर्धन चन्नावार प्रथम शृही बनकर द्वितीय व मंथन मेहेर तृतीय अशाप्रकारे विजयाचे मानकरी ठरले.

तिन्ही गटात प्रथम क्रमांकास रोख व स्पर्धा ट्राफी, १०-१० रोख पुरस्कार व ३-३ प्रोत्साहन पुरस्कार देऊन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. बक्षिस समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे सर होते. बक्षीस वितरक व प्रमुख मार्गदर्शक प्रा. दिलिपजी जगनाडे ब्रम्हपुरी, तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रा.चव्हाण सर, डॉ.प्रेमलाल मेश्राम, डॉ तरल नागमोती यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून बक्षीस वितरण केलेत. स्पर्धा संयोजक निलेश बांडे, मुकुल सयाम, मुख्य आर्बिटर प्रविण पानतावणे (नागपुर), प्रकाश वैद्य, वेदांत बांडे, मुकूल बरडे, दायल दोनाडकर ,रोशन सहारे (गड) तसेच रितेश उरकुडे यांनी योग्य नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

अतिथी परिचय व प्रास्ताविक तसेच आभार प्रदर्शन मुनिराज कुथे यांनी केले तर प्रा.मनिषा गेडाम यांनी संचालन केले.

✽✽✽✽✽✽

# ब्रम्हपुरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या निशुल्क ट्युशन क्लासेसचे उद्घाटन

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेहमी सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात नाविन्य उपक्रम घेणाऱ्या BSA ब्रह्मपुरी स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे स्वातंत्र्य दिनाच्या शुभपर्वावर गरजू विद्यार्थ्यांसाठी दिनांक १५ ऑगस्ट २०२६ ला सकाळी गुजरी वार्ड येथील दिलशाद मंजिल इमारतीत निशुल्क शिकवणी (ट्युशन ) क्लासेस चे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून डॉ. एन. जे. चव्हाण सर तर अध्यक्ष म्हणुन गाजी पटेल सर तर प्रमुख अतिथी म्हणुन ब्रह्मपुरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. देविदास जगनाडे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक भाऊरावजी राऊत सर, डॉ .दिलीपजी जगनाडे सर, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ. तरल नागमोती मॅडम, तालुका क्रीडा संयोजक गोपालजी भानारकर सर, शिकवणी वर्गाचे डायरेक्टर खुशबू फातिमा मॅडम, पूजा जुआरे मॅडम , संध्याताई कुथे मॅडम, पूर्वा कन्हाडे मॅडम उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.एन .जे.चव्हाण सर यांनी शिक्षणासोबतच या ट्युशन क्लासेस मध्ये संगणक व क्रीडा इतर शिक्षण सुद्धा दिले मिळणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन राहुल जुआरे यांनी, प्रास्ताविक डॉ. देविदास जगनाडे सर व आभार प्रदर्शन खुशबू फातिमा मॅडम यांनी केले. याप्रसंगी बहुसंख्येने विद्यार्थी पालक वर्ग उपस्थित होते.

# जि.प. शाळेत विद्यार्थ्यांना नोटबुकचे वितरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

तोरगांव बुज येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी नोटबुक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या वतीने तसेच सुधीरभाऊ शिवरकर अध्यक्ष विमुक्त जाती भटक्या जमाती तालुका ब्रम्हपुरी यांच्या मार्फत शाळेतील विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून, विद्यार्थ्यांमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी आनंदाने नोटबुक स्वीकारत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तोरगांव बुजचे सरपंच संजयजी राऊत, दिपकजी राऊत, श्रावणजी राऊत, अविनाश रुईकार, निखिल रामटेके, प्रशिक वासनिक यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षीका उपस्थित होते.

**... QUOTES ...**

"The weak can never forgive. Forgiveness is the attribute of the strong."
- Mahatma Gandhi

# बिपीएलधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना नगर परिषदचे सभागृह अल्पदरात उपलब्ध करावे

## प्रशांत डांगे यांची न.प. प्रशासनाकडे मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषदेच्या मालकीचे राजीव गांधी सांस्कृतिक सभागृह हे शहरातील सर्वसामान्य, गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या सामाजिक गरजांसाठी परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डांगे यांनी मुख्याधिकारी तथा नगराध्यक्ष, नगर परिषद ब्रम्हपुरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

काही महिन्यांपूर्वी राजीव गांधी सांस्कृतिक सभागृहाचा सुमारे साडेबारा लाख रुपयांचा ठेका झाल्यानंतर तो रद्द करून नगर परिषद प्रशासनाला पुन्हा नव्याने निविदा काढण्याची प्रक्रिया करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, सार्वजनिक मालमत्तेतून महसूल मिळविण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना परवडणाऱ्या दरात सुविधा उपलब्ध करून देणे ही नगर परिषदेची सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रशांत डांगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आजच्या वाढत्या महागाईच्या काळात गरीब व आर्थिकदृष्ट्या कमजोर कुटुंबांना खासगी सभागृहाचे हजारो रुपयांचे भाडे देणे शक्य होत नाही. त्यामुळे नगर परिषदेच्या मालकीचे हे सार्वजनिक सभागृह बीपीएलधारक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ब्रम्हपुरी शहरातील नागरिकांना केवळ १,००० नाममात्र भाड्यात उपलब्ध करून द्यावे, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे.

यासाठी लाभार्थ्यांकडून BPL कार्ड, उत्पन्नाचा दाखला किंवा शासनमान्य आर्थिक दुर्बलतेचा पुरावा घेऊन पारदर्शक पद्धतीने सवलत देण्यात यावी. तसेच सभागृहाचा नव्याने ठेका देताना ठेकेदारासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात बीपीएल व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना १ हजार रूपयामध्ये सभागृह उपलब्ध करून देण्याची स्पष्ट व बंधनकारक अट समाविष्ट करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## आंदोलनाच्या इशारानंतर दुसऱ्याच दिवशी कामाला सुरूवात

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील गांगलवाडी ते व्याहाड या मुख्य रस्त्याचे बांधकाम गेल्या दोन वर्षांपासून सुरू असून या रस्त्यावरील हळदा गावात अर्धवट सोडून दिलेल्या नाली बांधकामामुळे गावात मोठ्या अपघाताची आणि आरोग्याच्या गंभीर समस्येची भीती निर्माण झाली आहे.

काम ७ दिवसांत पूर्ण करण्याकरीता संबंधित बांधकाम कंत्राटदाराला सांगण्यात आले. काम पूर्ण न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला. भाकपाचे विनोद झोडगे यांच्या इशाऱ्यानंतर त्वरीत दुसऱ्याच दिवशी कामाला सुरूवात करण्यात आली.

**चारोळी**

कामचुकार चतुर माणसं
बहिरेपणाचं सोंग घेतात...
ज्यांना कमी दिसतं ते
नको ते डोळे फाडून बघतात...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा






ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये ८० वा स्वांतत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. नेवजाबाई भैया हितकारणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १५ ऑगस्ट हा देशाचा अभिमानाचा दिवस आहे. स्वातंत्र्य दिन म्हणजे आपल्या हृदयात नवी उर्जा नवी आशा, उत्साह आणि देशभक्तीचा सचार असतो. अशाच उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया सर यांचेसह भास्कर उराडे सर, गौरव भैया सर, अजय भट्टड सर, रमेशजी छाबडा सर, धनेश अग्रवाल सर, आशिता भैया मॅडम, डॉ. राखडे सर, डॉ. आखाडे सर, डॉ. बनवाडे सर यांचेसह शाळेचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम व पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होते.

या दिवसाचे औचित्य साधून इयत्ता १२ वी मध्ये सर्वोत्तम गुण मिळविण्याऱ्या तसेच १० वी मध्ये मराठी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळविण्याऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सीबीएसई १२ वी बोर्ड परिक्षेत ओजस डी. नाकाडे याने ९१.४० टक्के गुण व JEE mains मध्ये ९९.६० टक्के गुण मिळवुन जिल्हा टॉपर येण्याचा मान मिळवित IIT (Mandi) हिमाचल प्रदेश येथे आपले स्थान निश्चित केले. त्याचप्रमाणे हरीश दडमल याने १२ वी मध्ये ८४.४० टक्के गुण व JEE mains मध्ये ९४.३४ टक्के गुण मिळविले व IIT (Roorkee) उत्तराखंड येथे आपले स्थान निश्चित केले. तसेच 'प्रायमरी स्कॉलरशिप एक्झामिनेशन वर्ग ४ थी मध्ये घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत समर रितेश तितरमारे याने महाराष्ट्रामध्ये १० वा मेरीट येत परीक्षा उत्तीर्ण केली. या तिनही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या अतुल्य यशाबद्दल स्वातंत्रदिनाचे औचित्य साधून विद्यार्थी तथा पालक यांच्या उपस्थितीत एन. एच. एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोक भैया सर, एल. एम. बी. स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम तथा झोडे मॅडम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.

प्रसंगी स्वातंत्र्य दिनाचा आनंद द्विगुणीत व्हावा यासाठी देशभक्तीपर गीतांचे गायन तसेच नृत्य सादरीकरण करण्यात आले. स्वातंत्र्याचा हा सोहळा संगीत व नृत्य सादरीकरणाने जास्त सुशोभित झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी 'देस रंगीला रंगीला' आणि 'हिंदुस्ता का परचम सदा लहराते रहेंगे हम' ही गीते गाऊन उपस्थितांची मने जिंकली. तसेच 'वंदे मातरम' या गाण्यावर मुलांनी अप्रतिम असे नृत्य सादर केले. कार्यक्रमाला शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेसह विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती. अशाप्रकारे भारताचा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.


Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


## ब्रम्हपुरीकरांना मच्छरांचा वेढा : न.प...

(पान क्र. १ वरून)

अफाट वाढून लोकांचे जीव धोक्यात आल्यावरच फवारणी करायची, की मच्छर वाढण्याआधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करायच्या, असा साधा पण अत्यंत महत्त्वाचा सवाल नागरिक विचारत आहेत. एका बाजूला 'स्वच्छ, सुंदर आणि स्मार्ट ब्रह्मपुरी शहर' या अभियानाचा गाजावाजा केला जातो, तर दुसऱ्या बाजूला शहरात डासांचे ढग फिरत आहेत. हा कसला स्मार्टपणा? नागरिकांच्या आरोग्याला आता तरी प्राधान्य द्या, फवारणीचा हिशोब जनतेसमोर मांडा आणि तातडीने उपाययोजना करा, अशी तीव्र मागणी जोर धरत आहे. शहरात सध्या एकाच वाक्याची जोरदार चर्चा आहे- 'आता फक्त मच्छरांना नाही, तर प्रशासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेला फवारणीची गरज आहे!' प्रश्न नागरिकांचा आणि त्यांच्या जीवाचा आहे, त्यामुळे आता टोलवाटोलवी न करता लोकप्रतिनिधींनी आणि प्रशासनाने आपली जबाबदारी ओळखून तातडीने कामाला लागावे, एवढीच सामान्य ब्रह्मपुरीकरांची माफक अपेक्षा आहे.

******

## पाणी नाही तर नळटॅक्स भरणार नाही
## बोंडेगांव हुडकी वासियांचा न.प.ला इशारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर परिषद अंतर्गत रामनगर बोंडेगांव (हुडकी) वार्ड नं. ६ मध्ये मागील दिड वर्षापासून नळाला पाणी येत नसल्यामुळे सामान्य जनतेला पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. उन्हाळयात तसेच पावसाळयात सुध्दा नळाला पाणी येत नाही. नळाला पाणी पुरवठा नियमित करावा अन्यथा आम्ही नळटॅक्स भरणार नाही. असा इशारा निवेदनातून देण्यात आला. यावेळी बोंडेगाव हुडकी भागातील पाईपचे निरिक्षण करून लवकर नवीन पाइप चे पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येणार व दलीत वस्ती निधी अंतर्गत सोलर बोअरवेल करून देण्यात येणार असे आश्वासन मुख्याधिकारी यांनी दिले. निवेदन देतांना नगरसेवक मनोज भूपाल यांचेसह महीला मंडळ, रामनगर बोंडेगांव हुडकी वासीय उपस्थित होते.

## भविष्य घडविण्यासाठी अंमली पदार्थांपासून दूर रहा
### पोलीस निरिक्षक प्रमोद बानबले यांचे प्रतिपादन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांचे सेवन करु नये. हे पदार्थ तुमचे शरीर पोखरून मन कमकुवत करतात, त्यामुळे चिंता, निराशा, नकारात्मक भाव निर्माण होतो. आपले भविष्य घडविण्यासाठी अमली पदार्थांपासून तुम्ही दूर रहा!' असे आवाहन ब्रह्मपुरीचे पोलिस निरीक्षक प्रमोद बानबलेंनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'अमली पदार्थ विरोधी मोहीम' कार्यक्रमात बोलत होते. याबाबत विद्यार्थ्यांना शपथही देण्यात आली. याप्रसंगी डॉ धनराज खानोरकरांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रम प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाला डॉ राजेंद्र डांगे, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे व नगरसेविका, पोलिस ठाण्याचे कर्मचारी व बहूसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन डॉ प्रकाश वट्टींनी केले.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404